ठाणे, शुक्रवार दि. १४ जून २०२४ वर्ष १३ अंक : ४७ पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

अग्रलेख

अदानीना भूखंड वाटप ?

पान क्र. ४ वर

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या बसगाड्या परत घ्या

पान क्र. ४ वर

डोंबिवली एमआयडीसीतील


## ४१ कंपन्यांना नोटीस

डोंबिवली : गेल्या महिन्यात अमुदान कंपनीमध्ये झालेल्या रिक्टरच्या शक्तिशाली स्फोटानंतर डोंबिवली एमआयडीसीतील घातक केमिकलच्या कंपन्या स्थलांतरित करण्याचे मागणी जोर धरू लागली आहे. कंपन्यांमध्ये आग आणि स्फोटांच्या घटना वारंवार घडत आहे. या पार्श्वभूमीवर प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे एमआयडीसीतील कंपन्यांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आलं आहे. आतापर्यंत केलेल्या सर्वेक्षणात नियमांचे पालन न करणाऱ्या ३३ कंपन्यांना क्लोजर नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. तर ८ कंपन्यांना वॉलियंटरी क्लोजर नोटीस पाठवण्यात आल्या आहेत.

### ८ कंपन्यांवर बंदची टांगती तलवार

*डोंबिवली एमआयडीसीच्या फेज १ आणि २ परिसरात जवळपास ७५० विविध उत्पादने घेणाऱ्या कंपन्या आहेत. यातील १५० रासायनिक, तर ११० कापड उद्योग आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळाने या कंपन्यांचे सर्वेक्षण सुरू करून आत्तापर्यंत ३३ कंपन्यांना क्लोजर नोटिसा पाठविल्या आहेत. या नोटिसांनंतर संबंधित कंपन्यांचा पाणी व वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. तर ८ कंपन्यांना वॉलियंटरी क्लोजर नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. या कंपन्यांना स्वतःहून कंपनी बंद करावी नाहीत कार्यवाही करावी लागेल असे प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सांगण्यात आले.*

### ८ कंपन्यांवर बंदची टांगती तलवार



*डोंबिवली एमआयडीसीच्या फेज १ आणि २ परिसरात जवळपास ७५० विविध उत्पादने घेणाऱ्या कंपन्या आहेत. यातील १५० रासायनिक, तर ११० कापड उद्योग आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळाने या कंपन्यांचे सर्वेक्षण सुरू करून आत्तापर्यंत ३३ कंपन्यांना क्लोजर नोटिसा पाठविल्या आहेत. या नोटिसांनंतर संबंधित कंपन्यांचा पाणी व वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. तर ८ कंपन्यांना वॉलियंटरी क्लोजर नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. या कंपन्यांना स्वतःहून कंपनी बंद करावी नाहीत कार्यवाही करावी लागेल असे प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सांगण्यात आले.*



'सगेसोयरे' प्रश्नी जरांगेंचा सरकारला

## १३ जुलैपर्यंत अल्टीमेटम

जालना : मराठा आरक्षणासाठी सगेसोयरीची अंमलबजावणी ३० जूनपूर्वी करा अशी आग्रही मागणी करत या प्रश्नी १३जुलैपर्यंत राज्य सरकारने ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा यापुढे सरकारचे ऐकणार नाही. सरकारने एक महिन्यात निर्णय न घेतल्यास निवडणुकीत उतरणार, यावेळी नाव घेवून उमेदवार पाडू, असा इशारा आज मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री शंभुराज देसाई यांना दिला. तसेच त्यांनी १३ जुलैपर्यंत आपले बेमुदत उपोषणही स्थगित केले आहे.

### उपोषण स्थगित

#### निर्णय न झाल्यास विधानसभा निवडणूक लढवणार

*मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी (१३ जून) सहा दिवसांनंतर आपले आमरण उपोषण स्थगित केले आहे. मनोज जरांगे यांच्या भेटीला सरकारचे शिष्टमंडळ अंतरवाली सराटीत दाखल आज दाखल झाले होते. मंत्री शंभुराज देसाई आणि खासदार संदिपान भुमरे यांनी मनोज जरांगेंसोबत चर्चा केल्यानंतर त्यांनी आपले उपोषण स्थगित केले आहे. पण त्यांनी सरकारला सगेसोयरेच्या अंमलबजावणीसाठी एक महिन्याची वेळ देत विधानसभा निवडणूक लढण्याचा इशारा दिला आहे.*

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे गेल्या सहा दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले होते. पण गेल्या दोन दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावत चालल्याने जरांगेंची भेट घेण्याकरिता नेतेमंडळींनी आंतरवली सराटीत रिघ घेतली होती. यानंतर आज मंत्री शंभुराज देसाई आणि खासदार संदिपान भुमरे यांनी सरकारचे शिष्टमंडळ म्हणून मनोज जरांगे यांची भेट घेतली आणि त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी शंभूराज देसाई यांनी मनोज जरांगे यांना तब्येतीची काळजी घेण्याचे तसेच सगेसोयरेच्या अंमलबजावणीचा निर्णय घ्यायला एक महिन्याचा वेळ द्यावा, अशी विनवणी केली. शंभूराज देसाईंच्या या मागणीवर मनोज जरांगे यांनी येत्या १३ जुलैपर्यंत सर्व गोष्टी रितसर कराव्यात, असे म्हणत आपले उपोषण स्थगित केले.

मनोज जरांगेंसोबत झालेल्या चर्चेत बोलताना शंभूराज देसाई म्हणाले की, सगेसोयऱ्यांच्या अंमलबजावणीसंबंधी सरकारची मानसिकता नाही हे मनोज जरांगेंनी डोक्यातून काढून टाकावा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शब्द दिला आहे. त्यामुळे हा प्रश्न कायद्याच्या चौकटीत सोडवण्याचा आणि इतरांचा विरोध व्हायला नको, म्हणून येणाऱ्या हरकती मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर ठेवल्या जातील. सगेसोयऱ्यांच्या बाबतीत तांत्रिक प्रक्रिया लवकर करू. यासाठी अधिकाऱ्यांना बोलावतो आणि त्यांना विचारतो किती हरकती आल्या आहेत. त्यातील किती छानणी केल्या आणि किती राहिल्या आहेत, याचा अहवाल जाहीर करण्यास सांगतो. पण तुम्ही तुमच्या तब्येतीकडे लक्ष द्या, मित्र म्हणून माझा ऐका. तुम्ही तुमचे प्रतिनिधी पाठवा, त्यांची नावं सांगा, मी मुख्यमंत्र्यांकडे बैठक लावतो, असे आश्वासन शंभूराज देसाई यांनी केले.

शंभूराज देसाईंच्या आश्वासनानंतर सगेसोयऱ्यांच्या अंमलबजावणीला किती दिवस लागतील, असा थेट सवाल मनोज जरांगे यांनी केला. यावर शंभूराज देसाई म्हणाले की, गेल्या दोन महिन्यांचा वेळ आचारसंहितेत गेला आहे. त्यामुळे थोडा वेळ वाढवून द्या, दोन महिने द्या अशी मागणी शंभुराज देसाईंनी केली. मात्र दोन महिने झाले की पुन्हा आचारसंहिता लागेल, त्यामुळे दोन महिने शक्य नाही, असं मनोज जरांगेंनी सांगितलं. तसेच गिरीश महाजन यांच्यासोबत ठरलं होतं, कायद्यात दुरुस्ती करायची आहे. शिंदे समितीचंही कुणबी नोंदींचं काम सुरू ठेवा. आमच्यावर मार खाऊन गुन्हे दाखल झाले ते तुम्ही लगेच मागे घेतो म्हटले होते, पण ते घेतले नाहीत. यावर शंभूराज देसाई म्हणाले की, गंभीर गुन्हे मागे घ्यायला अडचणी आहेत, पण काही गुन्हे मागे घ्यायचा प्रयत्न करतो. आचारसंहितेमुळे बैठक घेता आली नाही, पण मी लगेच बैठक घेतो, असं आश्वासनही शंभुराज देसाई यांनी केले.

### सरकारला १३ जुलैपर्यंतची मुदत

*दरम्यान, मनोज जरांगे यांनी सरकारला ३० जूनपर्यंत सगेसोयरेबाबतचा अध्यादेश काढा, अशी मागणी केली. यावर शंभूराज देसाई यांनी एक महिन्यांची मुदत मागितली, पण मनोज जरांगे सुरुवातीला त्यांना एक महिन्यांची मुदत वाढवून देण्यास तयार नव्हते. मात्र सरकारच्या शिष्टमंडळाने विनंती केल्यानंतर मनोज जरांगे यांनी सरकारला १३ जुलैपर्यंतची मुदत दिली. तसेच सरकारने महिनाभरात सगेसोयरेबाबत निर्णय घेतला नाही तर आपण आगामी विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरु, असा इशाराच मनोज जरांगे यांनी दिला. त्यामुळे आता सरकार सगेसोयरेची अंमलबजावणी करणार की, मनोज जरांगे यांना पुन्हा मराठा आरक्षणासाठी बसावे लागणार, हे पाहावे लागेल.*

नीट परीक्षा प्रकरण

## विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घ्या

### सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**नवी दिल्ली : नीट परीक्षेच्या निकालात ग्रेस गुण मिळालेल्या १५६३ विद्यार्थ्यांची गुणपत्रिका रद्द करून या विद्यार्थ्यांची २३ जून रोजी फेरपरीक्षा घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी दिले. मात्र, वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ६ जुलैपासून सुरू होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समुपदेशनावर (काऊन्सिलिंग) कुठलीही स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. ग्रेस गुण रद्द झालेली गुणपत्रिका स्वीकारण्याचा अथवा फेरपरीक्षा देण्याचा पर्यायही सर्वोच्च न्यायालयाने या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला आहे. नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि निकालातील गोंधळप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात तीन वेगवेगळ्या याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करून वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे केले जाणारे समुपदेशन थांबविण्याची मागणी या याचिकांमधून करण्यात आली आहे. त्यावर न्यायमूर्ती विक्रमनाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे.**

### नीट प्रकरणी आता उच्च न्यायालयात सुनावणी नाही

नीट परीक्षेतील गोंधळाविरोधात वेगवेगळ्या राज्यांमध्ये सुमारे २० हजार विद्यार्थ्यांनी याचिका दाखल केल्या होत्या. उच्च न्यायालयातही याप्रकरणी याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यामुळे यापुढे उच्च न्यायालयात सुनावणी होणार नाही.

### नीट परीक्षेत पेपरफुटी नाही : धर्मेंद्र प्रधान

नीट परीक्षेत पेपरफुटी झाल्याचा कुठलाही पुरावा नसल्याचे सांगून याबाबत होत असलेले आरोप केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी फेटाळून लावले आहेत. ते म्हणाले की, एनटीए ही देशातील विश्र्वासार्ह संस्था असून या संस्थेवर लावण्यात आलेले गैरप्रकाराचे आरोप निराधार आहेत. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले.

### नीट परीक्षेत गैरप्रकार झाल्याचा काँग्रेसचा आरोप

नीट परीक्षेत ग्रेस गुणांच्या घोळासह पेपरफुटी झाल्याचा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी केला आहे. सरकारमुळे नीट परीक्षेला बसणाऱ्या २४ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आल्याची टीका त्यांनी केली आहे.

**या सुनावणीदरम्यान युक्तिवाद करताना ग्रेस गुण मिळालेल्या १५६३ विद्यार्थ्यांची २३ जून रोजी फेरपरीक्षा घेतली जाणार आहे आणि या परीक्षेचा निकाल ३० जूनपूर्वी जाहीर केला जाणार असल्याची माहिती राष्ट्रीय चाचणी संस्थेचे (एनटीए) वकील नरेश कौशिक यांनी न्यायालयाला दिली. विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी ६ जुलैपासून सुरू होणाऱ्या समुपदेशनावर फेरपरीक्षेचा काहीही परिणाम होणार नसल्याचे त्यांनी सांगितले. नीट परीक्षेच्या निकालाचा आढावा घेण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या ग्रेस गुणांबाबत चौकशी करणार आहे. या समितीने ग्रेस गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका रद्द करून त्यांना फेरपरीक्षा देण्याचा पर्याय दिल्याची माहिती एनटीएच्या वकिलांनी दिली.**
**एनटीएची संपूर्ण बाजू ऐकून घेतल्यानंतर ग्रेस गुण मिळालेल्या १५६३ विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्याचे आदेश खंडपीठाने दिले. फेरपरीक्षा घेतल्यास नीट परीक्षेच्या निकालातील गोंधळ दूर होऊन सर्वकाही सुरळीत होईल, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. मात्र, विद्यार्थ्यांच्या समुपदेशनावर स्थगिती देण्यास खंडपीठाने नकार दिला. कथित पेपरफुटीप्रकरणी दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने ८ जुलै रोजी सुनावणी निश्र्चित केली आहे. विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्याचा प्रकार चुकीचा असल्याची बाब एनटीए संस्थेने न्यायालयापुढे मान्य केल्याचे याचिकाकर्ते व नीट परीक्षा कोचिंग संचालक अलख पांडे यांनी निकालानंतर सांगितले.**

### नीट परीक्षा गोंधळ, नेमके प्रकरण काय?

नीट परीक्षा २०२४ चा निकाल ४ जून रोजी जाहीर झाला. मात्र, या निकालात तब्बल १५६३ विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्यात आल्याने वादळ उठले आहे. असंख्य विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळाल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. नीट निकालातील गोंधळावरून महाराष्ट्र, दिल्ली, हरियाणासह देशभरात आंदोलन सुरू आहे. राष्ट्रीय चाचणी संस्थेचे (एनटीए) निकालातील गोंधळाची चौकशी करण्यासाठी समिती नेमली आहे. विद्यार्थी, पालकांनी निकालाविरोधात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

नणंद लोकसभेत तर भावजय राज्यसभेत

## सुनेत्रा पवारांची बिनविरोध निवड



**नवी दिल्ली : बारामती लोकसभा मतदारसंघातून शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे यांच्याकडून पराभूत झालेल्या सुनेत्रा पवार यांची अखेर राज्यसभेत बिनविरोध निवड झाली आहे. आज त्यांनी विधानसभेत जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानतंर अर्ज दाखल करण्याची मुदत संपली असून एकही अर्ज आलेला नाही. त्यामुळे सुनेत्रा पवारांची बिनविरोध निवड झाली आहे.**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची आज दुपारी ३ वाजेपर्यंत अंतिम मुदत होती. परंतु, ३ वाजेपर्यंत सुनेत्रा पवारांशिवाय कोणाचाही अर्ज न आल्याने सुनेत्रा पवारांची बिनविरोध झाली. आज त्यांनी दुपारी विधानसभेत जाऊन उमेदवारी अर्ज भरला. महायुतीच्या वतीने भाजपाच्या कोट्यातून त्यांनी हा अर्ज भरला होता.
उमेदवारी अर्ज भरल्यानंतर सुनेत्रा पवारांनी माध्यमांशी संवाद साधला होता. त्यावेळी त्या म्हणाल्या, पक्षाने मला राज्यसभेची अधिकृत उमेदवारी दिली आहे, त्याबद्दल पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, इतर नेते आणि पदाधिकाऱ्यांचे मी आभार मानते.

### पार्थ पवार नाराज?

सुनेत्रा पवार म्हणाल्या, माझ्या उमेदवारीबाबत जनतेतून मागणी होत होती. अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी देखील अशी मागणी केली होती. मात्र मी आमच्या कार्यकर्त्यांना विनंती केली की माझ्या उमेदवारीचा आग्रह धरू नये. मात्र त्यांनी माझ्या उमेदवाराची मागणी लावून धरली, खूप मोठ्या प्रमाणात मागणी झाल्यानंतर पक्षाने हा निर्णय घेतला. सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार हे देखील राज्यसभेच्या उमेदवारासाठी इच्छुक होते. त्यामुळे सुनेत्रा पवारांच्या उमेदवारी अर्जामुळे ते देखील नाराज असल्याची चर्चा आहे. यावर सुमित्रा पवार म्हणाल्या. पार्थ पवार यांनी देखील मला सांगितलं की कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार तुम्हीच राज्यसभेसाठी अधिकृत उमेदवार असलं पाहिजे. स्वतः पार्थ पवार यांचा देखील तसाच अग्रह होता.

## मुसळधार पावसामुळे डोंबिवली जलमय

डोंबिवली : मुसळधार पावसाने गुरुवारी दुपारी जोरदार हजेरी लावल्याने कल्याण डोंबिवली शहराच्या अनेक भागात पाणी तुंबले. डोंबिवली रेल्वे स्थानक परिसरातील नाले गटार सफाई योग्य रीतीने न केल्याने पहिल्याच पावसात डोंबिवली रेल्वे स्टेशन परिसर जलमय झाला. रेल्वे स्थानक भागातील रिक्षा वाहन तळ, बाजारपेठ, परिसरातील दुकानांमध्ये रस्त्यावरील पाणी घुसले. पादचारी तुंबलेल्या पाण्यातून वाट काढत इच्छित स्थळी जात होते. नालेसफाई शंभर टक्के झाली असल्याचा दावा करणाऱ्या कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाला पहिल्याच पावसाने उघड्यावर पाडले आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात पालिका अधिकारी निवडणुकीत व्यस्त असल्याने त्याचा गैरफायदा घेत नाले गटार सफाई करणाऱ्या ठेकेदारांनी उथळ कामे करून फक्त बिले काढण्याची कामे केली आहेत अशा तक्रारी वाढत आहेत.



गेले तीन वर्षपासून बंद पडलेल्या सुपर मॅक्स कंपनीतील कामगारांना अजूनही देणी देण्यात आलेली नाहीत यामुळे त्रस्त झालेल्या कामगारांनी मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातील निवासस्थाना बाहेर ठिय्या आंदोलन करून मुख्यमंत्र्यांनी न्याय द्यावा अशी मागणी केली. (छाया : मनोज सिंह)

## अलिबाग समुद्रात पर्यटक बुडाला

अलिबाग :- पुणे जिल्ह्यातील आळंदी येथून अलिबाग येथे आलेला पर्यटक अलिबाग समुद्रकिनारी बुडाला. त्याचा शोध सुरू आहे. अविनाश शिंदे वय २७ असे या पर्यटकाचे नाव आहे. ठरला आहे. आळंदी येथील कंपनीत काम करणारे पाच जण अलिबाग मध्ये गुरुवारी पर्यटनासाठी आले होते. अलिबाग समुद्र किनारी आल्यानंतर अविनाश समुद्रात पोहण्यासाठी गेला. पाण्याचा अंदाज न आल्याने. अविनाश समुद्रात बुडाला. जीवरक्षक हे जॅकेट घेऊन समुद्रात उतरले. मात्र अविनाशचा शोध लागला नाही. अलिबाग पोलीस ही घटनास्थळी दाखल झाले.

## 'चामुंडा' स्फोटातील मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री निधीतून मदत : फडणवीस

नागपूर : नागपूर जिल्ह्यातील हिंगणा एमआयडीसी परिसरातील चामुण्डा एक्सप्लोझिव्ह कंपनीत गुरूवारी (दि. १३) स्फोट झाला. यामध्ये ६ जणांचा मृत्यू झाला असून पाच जण गंभीर जखमी आहेत. या स्फोटातील मृतांच्या नातेवाईकांना राज्य शासनाच्या वतीने मदत दिली जाणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.फडणवीस म्हणाले, या घटनेत सहा जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. या घटनेत ३ जण गंभीर असून, त्यांना दंदे हॉस्पीटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन आणि पोलिस आयुक्तांशी मी संपर्कात असून, जिल्हा प्रशासनातर्फे आवश्यक ती सर्व मदत पुरविली जात आहे. पोलिस आयुक्तांनी घटनास्थळी तसेच रुग्णालयात भेट दिली आहे. मृतांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत देण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला मिळण्यासाठी पुन्हा स्थानिकांकडून केंद्राकडे पाठपुरावा

**पनवेल : सहा महिन्यांमध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन पहिले विमान उड्डाण होणार आहे. तसेच विधानसभेच्या निवडणूका तीन महिन्यांनंतर होणार असल्याने पनवेल व उरणमधील स्थानिक मतदारांच्या जिव्हाळ्याचा विषय असणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'दि. बा. पाटील' यांचे नाव मिळावे यासाठीचा लढा पुन्हा आक्रमक करण्याचा विचार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.**

मागील दोन वर्षांपासून पनवेल व उरण येथील विविध राजकीय पक्ष, स्थानिक प्रकल्पग्रस्त या लढ्यासाठी रस्त्यावर उतरुन आंदोलन करत आहेत. तरी केंद्र सरकारने या विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव जाहीर न केल्याने प्रकल्पग्रस्तांच्या मनात खदखद आहे. या रोषाचा फटका विधानसभेच्या निवडणूकीत पनवेल, उरण व नवी मुंबईतील उमेदवारांना बसू नये यासाठी भाजप व महायुतीच्या नेत्यांनी पुन्हा एकदा कंबर कसली आहे. बुधवारी पनवेल येथे दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या बैठकीत पुन्हा एकदा देशाचे पंतप्रधान, नागरी विमान वाहतूक केंद्रीय व राज्यमंत्र्यांकडे यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे बैठकीत एकमताने ठरविण्यात आले.
दि. बा. पाटील यांची २४ जूनला पुण्यतिथी आहे. राज्य सरकारने दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे असा प्रस्ताव केंद्र सरकारकडे मंजूरीसाठी पाठविला. मात्र दोन वर्षे झाले त्यावर कोणताही निर्णय केंद्र सरकारने दिला नाही. त्यानंतर उलवे येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रचार भव्य सभा झाली. त्या सभेत यावर कोणतेही भाष्य पंतप्रधान मोदी यांनी न केल्याने पनवेल व उरणचे प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजी व्यक्त केली. त्यानंतर लोकसभेच्या निवडणूकीसाठी खारघर येथील प्रचारसभेत ७ मेरोजी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमानतळाला दि. बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल असा विश्र्वास व्यक्त करुन पुन्हा स्थानिकांची साथ मिळविण्याचा प्रयत्न केला. यावर्ष अखेरीस या विमानतळाचा पहिला टप्पा मालवाहू विमानांचा सुरू होणार असल्याने अवघ्या सहा महिन्यांमध्ये या विमानतळाच्या नावावर केंद्राला सुद्धा निर्णय घेणे गरजेचे असणार आहे.
विमानतळाच्या नामकरणासोबत स्थानिक प्रकल्पग्रस्तांना या विमानतळामध्ये कोणत्या नोकर्या मिळणार याबाबत सिडको महामंडळाने अद्याप कोणतेही स्पष्ट भूमिका मांडली नसल्याने विमानतळाच्या नामकरणासोबत रोजगारासाठी या कृती समितीने पुढाकार घेण्याची मागणी स्थानिक सुशिक्षित भूमिपूत्रांकडून केली जात आहे. दि. बा. पाटील कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू नायडू यांच्यासह राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची नामकरणाबाबत भेट घेण्याचे बैठकीत ठरले. या बैठकीत माजी खा. संजीव नाईक, आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी, ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, नवी मुंबईचे दशरथ भगत, शेकापचे जे.एम. म्हात्रे, दि. बा. पाटील यांचे पूत्र अतुल पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक नितिन पाटील, जे. डी. तांडेल व इतर उपस्थित होते.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## अदानीना भूखंड वाटप ?

भाजपा सरकार अदाणींवर पुन्हा मेहरबान झाले असून अदाणींसाठी सत्ता राबवली जाते आहे, असा खळबळजनक आरोप वर्षा गायकवाड यांनी केला आहे. कुर्ला येथील मदर डेअरीची २१ एकरची जागा अदाणींच्या घशात घालण्याचे सरकारी फर्मान निघाले आहे. त्यासाठी कोणतीही टेंडर प्रक्रिया राबवण्यात आलेली नाही असाही आरोप वर्षा गायकवाड यांनी केंद्र सरकारवर केला आहे. कोट्यवधी रुपये किंमतीची ही मोक्याची जागा गौतम अदाणींना सरकारने बहाल केला आहे. हा एक महाघोटाळा आहे, असाही आरोप वर्षा गायकवाड यांनी केला. या आरोपामुळे अदाणी संशयाच्या भोवऱ्यात आले आहेत. अर्थात केंद्र सरकार याचा युक्तीवाद कसा करते त्यावर हे प्रकरण पुढे जाणार की कसे हे अवलंबून आहे.

खासदार वर्षा गायकवाड यांनी आरोप केला आहे की, मोदाणी (मोदी आणि अदाणी) अँड कंपनीला संपूर्ण मुंबई गिळायची आहे आणि त्यासाठी वाटेल त्या थराला जाण्याची भूमिका भाजपा सरकारने घेतलेली आहे. जी जमीन सरकारी आहे, ती जमीन अदाणींची आहे, असा प्रकार सुरु आहे. भाजपा सरकारने अदाणींसाठी धारावी टेंडर आणि टीडीआर महाघोटाळा केला आणि धारावीकरांचा हक्क मारण्याचा कट रचला. नंतर धारावी पुनर्वसनाच्या नावाने पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असणाऱ्या मिठागरांच्या जमिनी व पूर्वी जकात नाक्यासाठी असलेली मुलुंड येथील महापालिकेची जागा आणि डम्पिंग ग्राउंडची जागा लुबाडण्याचा डाव मांडला. आता पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असणारी कुर्ला येथील मदर डेअरीची जागा यांना गिळून टाकायची आहे. कुणालाही विश्र्वासात न घेता, कुठलीही जनसुनावणी न करता हा हिरवळीचा भूखंड अदाणींच्या घशात घातला जात आहे. परंतु धारावी पुनर्वसनाच्या नावाखाली अदाणीला नाममात्र दराने हा भूखंड भेट देण्याचा डाव हाणून पाडू, असा इशाराही वर्षा गायकवाड यांनी दिला आहे.

मदर डेअरीने पूर्वी वापरलेल्या कुर्ला येथील या भूखंडावर सुमारे ९०० मौल्यवान झाडे आहेत, यामुळे येथील परिसर हा पर्यावरणपूरक आणि संवेदनशील आहे. पण या झाडांची निर्दयीपणे कत्तल करून या इको-सेन्सिटिव्ह भूखंडच्या मुद्रीकरणाचे मनसुबे महायुती सरकारचे आहेत. यापूर्वी भाजपाच्याच एका उच्चपदस्थ नेत्याचा डोळा या भूखंडावर पडला होता आणि या जागी औद्योगिक संकुल उभारण्याचा खेळ मांडला होता. त्यासाठी काही महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एमएमआरडीएची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली होती. पण आता पंतप्रधान नरेंद्र मोदींचे परम मित्र अदाणींची नजर या भूखंडावर पडली आहे, असा आरोप वर्षा गायकवाड यांनी केल्यामुळे सदर कथित भूखंड घोटाळ्याची चर्चा सुरू झाली आहे.

विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या पूर्वीच्या आदेशांना केराची टोपली दाखवत महसूल व दुग्धविकास विभागाने ही जागा अदानीच्या डीआरपीपीएलला भेट देण्याचा जीआर काढला आहे, असा थेट आरोपच खासदार वर्षा गायकवाड यांनी केला आहे. काँग्रेस पक्षाची भूमिका स्पष्ट असून एकाही धारावीकराला विस्थापित होऊ देणार नाही, प्रत्येक धारावीकराचे पुनवर्सन धारावीतच झाले पाहिजे. पात्र-अपात्र आम्ही मानत नाही अशी आमची भूमिका असल्याचे वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे. काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी केंद्र सरकारला धारेवर धरत या घोटाळ्याच्या चौकशीची मागणी केली आहे. अदाणीना मुंबईतील जागा दिली तर धारावीकरांना विस्थापित होऊ देणार नाही, असा इशारा गायकवाड यांनी दिला आहे. अदानीना मदर डेअरीची जागा देताना कोणतीही टेंडर प्रक्रिया राबवली नसल्याच्या मुद्द्यावर वर्षा गायकवाड यांनी बोट ठेवले आहे. हा मुद्दा संसदेच्या सभागृहात गाजणार काय हा कळीचा प्रश्न आहे.

## कसं काय पाव्हणं !

### अशोक सुतार



**मातृसंस्थेतून फोन आला होता, आम्हाला न विचारता मनमानी निर्णय का घेता ? तुमच्या सायबांचा मी साहेब आहे असे सांगा म्हणाले.**

# महापालिकेच्या चारही प्रभागांमध्ये अतिक्रमण कारवाई

पनवेल : पनवेल महापालिकेच्या कामोठे, खारघर, नावडे उपविभाग, पनवेल, कळंबोली अशा चारही प्रभागांमध्ये अनधिकृत टपऱ्या, फूटपाथवरील अनधिकृत फेरीवाले, अतिक्रमण केलेल्या दुकानांवरती आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार पाच प्रभाग अधिकाऱ्यांनी अतिक्रमण पथकाच्या माध्यमातून कारवाई केली.

शनिवार दिनांक ८ जून रोजी आयुक्त मंगेश चितळे यांनी चारही प्रभागातील अतिक्रमण केलेल्या दुकानांवरती, अनधिकृत फेरीवाले, टपऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानूसार पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त मारूती गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागांमध्ये अतिक्रमण कारवाई केली जात आहे. प्रभाग समिती 'क कामोठे मधील सेक्टर ११ येथील प्रस्तावित प्रभाग कार्यालय येथे अतिक्रमण केलेल्या अनधिकृत टपऱ्या, फेरीवाले यांच्यावरती जेसीबीच्या साहाय्याने आज निष्कासन कारवाई करण्यात आली . याचबरोबर कामोठे येथील सेक्टर ७ मधील मोकळ्या भूखंडावरील अनधिकृतपणे उभ्या केलेल्या झोपड्यावर कारवाई



करण्यात आली. खांदेश्र्वर रेल्वे स्थानकाजवळील अनधिकृत हातगाडे, फेरीवाले,अतिक्रमण केलेल्या टपऱ्या यावरती प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे यांनी कारवाई केली.

प्रभाग समिती अ उप विभाग नावडे फेज १, फेज २ येथील अनधिकृत नर्सरी, फेरीवाले यांच्यावरती आज कारवाई करण्यात आली. याचबरोबर दिनांक १२ जून रोजी प्रभात समिती अ उप विभाग नावडे सेक्टर ३५ येथील अनधिकृत मटण व चिकन शॉप चे १३ ताडपत्री शेडवरती प्रभाग अधिकारी अमर पाटील यांनी तोडक कारवाई केली. याचबरोबर तळोजा मजकूर कमानीजवळील लहान मोठे चार अनधिकृत होर्डिंग तोडण्यात आल्या.

तसेच गेल्या मंगळवारी दिनांक ११ जून रोजी खारघर प्रभाग समिती अ उप विभाग नावडे, पापडीचापाडा येथील अनधिकृत आठवडी बाजार बंद करण्यात आला

खारघरमधील सेक्टर २०,२१, २ येथे अनधिकृत हातगाड्या, फेरीवाले यांच्यावरती अतिक्रमण पथकाने आज कारवाई केली. तसेच कोपरा पुल येथे उभारलेल्या अनधिकृत झोपड्यांवरती आज प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांनी निष्कांसन कारवाई केली.

पनवेल प्रभागामध्ये बस स्थानकाजवळील अनधिकृत टपरींवर आज प्रभाग अधिकारी रोशन माळी यांनी कारवाई केली.

प्रभाग समिती ब अंतर्गत कळंबोली हद्दीतील फूटपाथवरील अनधिकृत फेरीवाले तसेच हायवेवरील अनधिकृत सर्व हेल्मेट स्टॉल्सवर प्रभाग अधिकारी अरविंद पाटील यांनी आज कारवाई करून त्यांचे समान जप्त केले.

### कल्याण व भिवंडीतील मागासवर्गीय मुलांमुलींचे

# शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया सुरु

ठाणे:- इयत्ता ८ वी पासून पुढील शिक्षण घेणाऱ्या व महाविद्यालयीन विभागातील प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या भिवंडी व कल्याण येथील मागासवर्गीय मुलामुलींचे शासकीय वसतीगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. वसतिगृह कार्यालयात प्रवेश अर्ज मोफत उपलब्ध आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्रवेशासाठी संपर्क साधावा, असे आवाहन वसतीगृहांचे गृहपाल प्र. ना. मडावी यांनी केले आहे.

वसतीगृहात प्रवेशासाठी अर्जासोबत लागणारी प्रमाणपत्रे (सर्व छायांकीत प्रती)-

१. गुणपत्रिका, २.शाळा सोडल्याचा दाखला, ३.जातीचा दाखला (सक्षम प्राधिकारी), ४.उत्पन्नाचा दाखला (सक्षम प्राधिकारी), ५. रहिवासी दाखला (सरपंच/तलाठी/नगरसेवक), ६. आधार कार्ड तसेच प्रवेश घेतेवेळी खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. शाळा / महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, २. आधार संलग्न बँक खात्याच्या पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत, ३. वैद्यकीय प्रमाणपत्र ४. पासपोर्ट साईज फोटो ५. १० रुपयांचे कोर्ट फी टिकीट लावून वसतिगृह नियमाचा करारनामा करुन द्यावे लागेल.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, भिवंडी, मानसरोवर शॉपीग कॉम्पलेक्स, पहिला माळा, भिवंडी, (संपर्क क्र ९७६७६१२८९७) मागास तथा आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह, भिवंडी, मानसरोवर शॉपिग कॉम्प्लेक्स, दुसरा माळा भिवंडी.मुलांचे शासकीय वसतिगृह (गुणवंत), कल्याण, गौरी अपार्टमेन्ट, पाचवा माळा, बेहतुरकर पाडा, कल्याण पश्र्चिम, (संपर्क क्र. ९७६७६१२८९७). या वसतिगृहात वर्ग ११ ते १२ व पॉलिटेक्निक प्रथम / आय. टी. आय मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. (हे वसतिगृह शासकीय इमारत, गौरीपाडा, कल्याण, येथे स्थलांतरित करण्यात येत आहे.)

# ठाण्यात कोट्यवधींची चोरी

### वसईमार्गे गाठलं राजस्थान; पोलिसांनी १०० सीसीटीव्ही तपासले, चोरट्याला माऊंट अबूच्या जंगलातून उचललं!

ठाणे : मालकाच्या दुकानात दागिन्यांची चोरी करून फरार झालेल्या एका सेल्स बॉयच्या ठाणे पोलिसांनी मोठ्या शिताफीने मुसक्या आवळल्या आणि त्याला गजाआड केले. आरोपीने पकडले जाऊ नये यासाठी सर्वतोपरी काळजी घेतली होती खरे परंतु पोलिसांनी त्याला राजस्थानमधील माउंट अबू येथून अटक केली.

ठाण्यातील नामवंत विरासत ज्वेलर्स या सुवर्ण पेढीचे मालक यशवंत पूनमिया यांनी आपल्या दुकानात तब्बल एक कोटी दहा हजार रुपयांची चोरी झाल्याची तक्रार नौपाडा पोलिसात केली. दुकानातील सेल्स बॉय म्हणून काम करणाऱ्या २९ वर्षे विशालसिंग राजपूत याने ११ मे रोजी दुकानातील तब्बल १८०७.६०० ग्रॅम सोन्याचे दागिने घेऊन पोबारा केला होता. पोलिसांना आपला कोणताही पत्ता मिळू नये यासाठी आरोपी मोठ्या हुशारीने कार्यालयातील आधार कार्ड आणि इतर कागदपत्र घेऊन पळाला होता. पोलिसांनी जवळपास १०० सीसीटीव्हीचे फुटेज तपासल्यानंतर आरोपी तब्बल आठ ते दहा रिक्षा बदलून वसई येथे पळून गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी त्यांनी आपला मोबाईल मुंबईकडे जाणार आहे का ट्रकमध्ये फेकून दिला होता. पोलिसाचा माघ काढत गुजरात आणि राजस्थानपर्यंत पोहोचली व त्यांनी आरोपीचा माग काढण्यास सुरुवात केली. पोलिसांना आपला थांब पत्ता लागू नये यासाठी आरोपी कोणत्याच लॉजमध्ये न राहता राजस्थानातील माउंट अबू येथील जंगलामध्ये वास्तव्य करून होता. दिवसा तो घनदाट जंगलात लपून राहत असे व झोप पूर्ण करण्यासाठी रात्री कोणत्याही बसने प्रवास करत असे.

# मुंबईत हिवतापाचे सर्वाधिक रुग्ण

मुंबई : मुंबईत जानेवारी-मे या कालावधीत हिवतापाचे १,६१२ रुग्ण आढळले. मागील चार वर्षांच्या तुलनेत ही रुग्णसंख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे हिवताप निर्मूलनासाठी राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिका करीत असलेले प्रयत्न अपुरे असल्याचे निदर्शनास आले आहे.

सरकार आणि पालिका हिवताप निर्मूलनासाठी सर्वतोपरीने प्रयत्न करीत आहे. मात्र तरीही गेल्या पाच महिन्यांमध्ये हिवतापाचे एक हजार ६१२ रुग्ण आढळले आहेत. मुंबईत २०२१ मध्ये हिवतापाचे १,४०१ रुग्ण सापडले. तर, २०२२ मध्ये ८९३ रुग्ण आणि २०२३ मध्ये १ हजार १९० इतके रुग्ण आढळले होते. २०२२ मधील जानेवारी ते मे या पाच महिन्यांच्या कालावधीत हिवतापाच्या रुग्णांत वाढ झाली आहे. शिवाय डेंग्यू, हेपेटायटिस आणि चिकनगुनिया या आजारांच्या तुलनेतही गेल्या पाच महिन्यांत हिवतापाच्या रुग्णांची संख्या अधिक आहे. जानेवारी ते मे या पाच महिन्यांमध्ये डेंग्यूचे ३३८, चिकनगुनियाचे २१ व हेपेटायटिसचे २४८ रुग्ण सापडले.

साथीच्या आजारांच्या रुग्णसंख्येत २०२१ व २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये लक्षणीय वाढ झाली. पालिकेने २०२३ मध्ये रुग्णांची नोंद घेण्याची व्याप्ती वाढवली होती. पूर्वीच्या २२ ऐवजी थेट ८८० वैद्याकीय संस्थांनी आजारांच्या रुग्णांच्या संख्येची नोंद करण्यास सुरुवात केली. यात रुग्णालये, दवाखाने व वैद्यकीय प्रयोगशाळांचाही समावेश आहे. त्यामुळे २०२३ मध्ये साथीच्या आजारांमध्ये वाढ झाल्याचे पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शहा यांनी सांगितले.

### मुंबई शिक्षक व पदवीधर,कोकण विभाग पदवीधर मतदार संघात

# एकूण ३ लाख ५९ हजार ७३७ मतदारांची नोंदणी

नवी मुंबई : भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, मुंबई शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक आयोगामार्फत मतदारसंघनिहाय मतदारांची आतापर्यंतची एकूण ३ लाख ५९ हजार ७३७ मतदारांची नोंदणी झाली अशी माहिती उपआयुक्त (सा.प्र.)कोकण विभाग तथा सह. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी दिली. मुंबई पदवीधर मतदार संघात मुंबई शहर स्त्री १२ हजार ८७३ व पुरुष १७ हजार ९६९ तर तृतियपंथी १, मुंबई उपनगर स्त्री ३६ हजार ८३८ व पुरुष ५२ हजार ९८७ तर तृतियपंथी ५ असे एकूण १ लाख २० हजार ६७३ मतदार आहेत. मुंबई शिक्षक मुंबई शहर स्त्री ०२ हजार १४ व पुरुष ५११ तर तृतियपंथी ०, मुंबई उपनगर स्त्री ०९ हजार ८७२ व पुरुष ०३ हजार ४४२ तर तृतियपंथी ० असे एकूण १५ हजार ८३९ मतदार आहेत.

कोकण विभाग पदवीधर मतदार संघात पालघर जिल्हा स्त्री १२ हजार ९८७ व पुरुष १५ हजार ९३० तर तृतियपंथी ८, ठाणे जिल्हा स्त्री ४२ हजार ४७८ व पुरुष ५६ हजार ३७१ तर तृतियपंथी ११, रायगड जिल्हा स्त्री २३ हजार ३५६ व पुरुष ३० हजार ८४३ तर तृतियपंथी ९, रत्नागिरी जिल्हा स्त्री ०९ हजार २२८ व पुरुष १३ हजार ४५३ तर तृतियपंथी ०, सिंधुदुर्ग जिल्हा स्त्री ०७ हजार ४९८ व पुरुष ११ हजार ०५३ तर तृतियपंथी ०, असे एकूण २ लाख २३ हजार २२५ नोंदणी होणाऱ्या पदवीधर मतदारांची संख्या आहेत.

# फनवेल महापालिकेच्यावतीने बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवरती नियोजन बैठक

पनवेल : येत्या सोमवारी येणारा बकरी ईद सण उत्साह पूर्ण व शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करुन ,शांततेत साजरा होण्याकरिता नियोजन करण्याच्या हेतूने आज दिनांक १३ जून रोजी महापालिकेच्या मुख्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षते खाली बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकिस पशुसंवर्धन कोकण विभागाचे सह आयुक्त डॉ. प्रशांत कांबळे, उपायुक्त वैभव विधाते, मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भगवान गीते, तळोजाचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक अविनाश काळदाते, पनवेल पोलिस ठाणेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल पाटील, उपअभियंता सुधीर सांळुखे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन विभाग पनवेलडॉ.जी.व्ही पाटील,पंचायत समितीचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ. ए.बी मारकवार, सर्व प्रभाग अधिकारी, घनकचरा आणि आरोग्य विभागाचे अधिकारी, चारही प्रभागातील मुस्लिम समाजाचे ५० पेक्षा अधिक प्रतिनिधी उपस्थित होते.

दिनांक १७ जूनते १९ जून पर्यंत पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बकरी ईद सण साजरा करण्यात येणार आहे. सदर सणानिमित्त मुस्लीम बांधवाकडून कुर्बानी देण्याची प्रथा आहे. कुर्बानी देणेकामी तात्पुरते कत्तलखाने उभारणेकरिता परवानगी घेणे आवश्यक असते. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बकरी ईद करीता कुर्बानीसाठी विविध अटी व शर्तीस अधिन राहुन तात्पुरता कत्तलखाना उभारण्यास परवानगी देण्यात येत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी प्रभाग समिती निहाय, प्रभाग अधिकारी यांना बकरी ईद निमित्त तात्पुरते कत्तलखान्यास सदर परवानगी देणेकामी प्राधिकृत करण्यात आले आहे. नागरिकांनी परवानगीसाठी अर्ज करतेवेळी सोसायटी व पोलिस विभागाची परवानगी ना हरकत पत्र देणे आवश्यक आहे. कत्तल खान्याच्या ठिकाणी आरोग्यचा प्रश्र्न निर्माण होणार नाही याची दक्षता संबंधित अर्जदारांनी घ्यायची आहे. परवानगीसाठी शनिवार व रविवारी प्रभाग कार्यालये सुरू ठेवण्यात येणार आहेत. याच बरोबर यावर्षी पशुसंवर्धन खात्याकडून टॅग असलेल्याच मोठ्या प्राण्याचे बळी देण्यास परवानगी देण्यात येणार असल्याचे पशुसंवर्धन कोकण विभागाचे सह आयुक्त डॉ. प्रशांत कांबळे यांनी सांगितले. यासाठी लवकरात लवकर नागरिकांनी पशुसंवर्धन विभागाकडे अर्ज करून परवानगी घ्यावी असे आवाहन यावेळी उपस्थितांना करण्यात आले. मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही चारही प्रभागांमध्ये ज्या ठिकाणांना परवानगी देण्यात आली होती, त्याठिकाणीच बकऱ्यांची कत्तल केली जावी, ही ठिकाणी बंधिस्त असावीत, जनावरांच्या मासांची वाहतुक काळ्या पॉलीथीन पिशव्यांमध्येच करावी अशा विविध सूचना या बैठकित देण्यातआल्या. हा सण शांततेत ,उत्साहात संपन्न होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी आयुक्त व पोलिस विभागाच्यावतीने करण्यात आले .

# ठाण्यात नव्या खासदारांच्या बैठकीला भाजपची दांडी

ठाणे : शहरातील पावसाळा पूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी शिवसेनेचे नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांनी प्रशासन आणि माजी नगरसेवकांची एकत्रित बैठक बुधवारी सायंकाळी आयोजित केली होती. मात्र, या बैठकीला भाजपाचे माजी नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने शहरात वेगवेगळय़ा चर्चेला रंगल्या आहे.

दरम्यान पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बैठक होणार असून त्याच्या नियोजनासाठी भाजपा कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आल्यामुळे भाजपाचे नगरसेवक अनुपस्थित असल्याचा दावा पक्षा नेत्यांकडून करण्यात आला आहे.

ठाणे लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या उपस्थितीत ठाणे शहरातील सर्व माजी नगरसेवकांची आढावा बैठक आयोजित केली होती.

सर्व प्रभागातील पावसाळा पूर्व कामांचा आढावा घेऊन ती तातडीने पूर्ण व्हावीत तसेच पावसाळय़ात आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी समन्वयाने काम करून नागरिकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत, यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचा निरोप म्हस्के यांनी दोन दिवसांपूर्वी महायुतीतील सर्व माजी नगरसेवकांना दिला होता. या बैठकीला भाजपाचे माजी नगरसेवक अनुपस्थित राहिल्याचे दिसून आले.

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

सा.बां. विभाग क्र.१, ठाणे. स्टेशन रोड, ठाणे- ४०० ६०१

| | | |
|---|---|---|
| www.mahapwd.com | Fax-(०२२) २५६७७२४० | Email-thane1.ee@mahapwd.gov.in |
| जा. क्र ठावि/निविदा/ ६३७६ | दुरध्वनी २५३६९२९३ | दिनांक :- ११/०६/२०२४ |

**निविदा शुध्दीपत्रक क्र.४ (वेळापत्रक)**

कामाचे नाव : ठाणे शहरातील सार्वजनिक बांधकाम विभाग व तहसील कार्यालय परिसर यांचा एकत्रित पुनर्विकास करणेसाठी नवीन प्रशासकीय इमारत बांधणे. (अंदा. कि. रु. ४७०,९२,१२,४३९.००)

संदर्भः निविदा सुचना क्र. १३० सन २०२३-२४ या कार्यालयाचे पत्रक. जा.क्र/ठावि/निविदा/३३२४ दि. ०४/०२/२०२४.

| अ. क्र. | निविदा | पुर्वी प्रसिध्द झालेला मजकुर /दिनांक | बदल करण्यात आलेला मजकुर/दिनांक |
|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री | ०७.०३.२०२४ ते २७.०३.२०२४ | ०७.०३.२०२४ ते ०५.०७.२०२४ |
| २ | निविदापुर्व बैठक | १९.०३.२०२४ | २५.०६.२०२४ |
| ३ | निविदा उघडण्याचा दिनांक | २८.०३.२०२४ | ०८.०७.२०२४ |

सही/-
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग क्र.१, ठाणे

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

■ पदाचे नाव : विद्युत सहाय्यक
शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
■ वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## सीमा सुरक्षा दल

### सीमा सुरक्षा दल

■ combatised/group_B/2024 1 इंस्पेक्टर (Librarian)
■ combatised/group_B_C/2024 2 सब इंस्पेक्टर (Staff Nurse)
■ असिस्टंट सब इंस्पेक्टर (Lab Tech)
■ असिस्टंट सब इंस्पेक्टर (Physiotherapist)
■ SMT_WKSP/२०२४ सब इंस्पेक्टर (Vehicle Mechanic)
■ कॉन्स्टेबल (OTRP)
■ कॉन्स्टेबल (SKT)
■ कॉन्स्टेबल (Fitter)
■ कॉन्स्टेबल (Carpenter)
■ कॉन्स्टेबल (Auto Elect)
■ कॉन्स्टेबल (Veh Mech)
■ कॉन्स्टेबल (BSTS)
■ कॉन्स्टेबल (Upholster)
Veterinary_Staff/2024 हेड कॉन्स्टेबल (Veterinary)
■ हेड कॉन्स्टेबल (Kennelman)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: ग्रंथालय विज्ञान किंवा ग्रंथालय आणि माहिती विज्ञान या विषयात पदवी.
पद क्र.२: (१) १२वी उत्तीर्ण (२) जनरल नर्सिंग डिप्लोमा/पदवी
पद क्र.३: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) डीएमएलटी
पद क्र.४: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) फिजियोथेरपिस्ट डिप्लोमा/पदवी (३) ०६ महिने अनुभव
पद क्र.५: ऑटोमोबाईल/ मेकॅनिकल डिप्लोमा/पदवी
पद क्र.६ ते १३: (१) १०वी उत्तीर्ण (२) संबंधित ट्रेड मध्ये
पद क्र.१४: (१) १२वी उत्तीर्ण (२) व्हेटर्नरी स्टॉक असिस्टंट कोर्स (३) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.१५: (१) १०वी उत्तीर्ण (२) शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालय किंवा दवाखाना किंवा पशुवैद्यकीय महाविद्यालय किंवा शासकीय पशु फार्म येथून जनावरे हाताळण्याचा दोन वर्षांचा अनुभव.
■ वयाची अट: १७ जून २०२४ रोजी, /: ०५ वर्षे सूट, : ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ५: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.२: २१ ते ३० वर्षे
पद क्र.३: १८ ते २५ वर्षे
पद क्र.४: २० ते २७ वर्षे
पद क्र.६ ते १५: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी /: फी नाही
पद क्र.1,2, 5, 14 & 15: General/OBC/EWS: ₹200/-
पद क्र..3,4, 6 ते13: General/OBC/EWS: ₹100/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.bsf.gov.in/






## इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र

■ पदाचे नाव :
१ सायंटिफिक ऑफिसर/E
२ सायंटिफिक ऑफिसर/D
३ सायंटिफिक ऑफिसर/C
४ टेक्निकल ऑफिसर
५ सायंटिफिक असिस्टंट/C
६ नर्स/-
७ सायंटिफिक असिस्टंट/B
८ फार्मासिस्ट
९ टेक्निशियन
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) M.B.B.S. (ii) M.S./ M.D. (iii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) MBBS (ii) M.D.S./ B.D.S./M.D./M.S. (iii) ०३/०५ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) M.B.B.S. (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.४: ५०% गुणांसह फिजिओथेरपी P.G.पदवी
पद क्र.५: ५०% गुणांसह MSW
पद क्र.६: B.Sc.(Nursing) किंवा १२वी उत्तीर्ण + -NM²
पद क्र.७: ६०% गुणांसह B.Sc. (Medical Lab Technology) किंवा ६०% गुणांसह PG DMLT किंवा B.Sc. (Radiography) किंवा ५०% गुणांसह B.Sc. + रेडिओग्राफी डिप्लोमा किंवा ६०% गुणांसह B.Sc. (Nuclear Medicine Technology) + ५०% गुणांसह B.Sc. + DMRIT/ DNMT/DFIT
पद क्र.८: (i) १२वी उत्तीर्ण (ii) फार्मसी डिप्लोमा
पद क्र.९: (i) ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Science). (ii) Plaster / Orthopaedic Technician/ ECG Technician/ Cardio Sonography / Echo Technician प्रमाणपत्र
■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते ५० वर्षे
पद क्र.२: १८ ते ४० वर्षे
पद क्र.३ ते ७: १८ ते ३५ वर्षे
पद क्र.८ ९: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: कल्पाक्कम (तमिळनाडु)
■ फी : SC/ST/महिला: फी नाही
पद क्र.१ ते ३: ३००/-
पद क्र.४ ते ६: २००/-
पद क्र.८ ९: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.igcar.gov.in/

# रानभाज्या बाजारात दाखल; जांभूळ, करवंदांसह, रानभाज्यामुळे आदिवासी महिलांना मिळतोय रोजगार

बदलापूरः बदलापूर, अंबरनाथ आणि आसपासच्या परिसरातील बाजारपेठांमध्ये रानभाज्या आणि रानमेवा दाखल झाला आहे. बदलापूर शहराची बाजारपेठ, शहराच्या वेशीवरील एरंजाड, सोनिवली परिसरासह कल्याण अहमनदगर राष्ट्रीय महामार्गावर आदिवासी महिलांकडून रानभाज्यांची विक्री केली जात आहे. कोणत्याही मशागतीशिवाय उगवणाऱ्या या रानभाज्या पौष्टीक आणि आरोग्याच्या दृष्टीने गुणकारी असतात. त्यामुळे जून महिन्यात या रानभाज्यांना पसंती मिळते. त्यामुळे आदिवासी कुटुंबाना आणि विशेषतः महिलांना हक्काचा रोजगार मिळतो आहे.

ग्रामीण भागात दैनंदिन आहारात रानभाज्यांचे मोठे महत्व आहे. आदिवासी बांधव आपल्या जुन्या जाणत्या बांधवांनी दिलेल्या माहितीच्या जोरावर रानातून या भाजा निवडून आणतात. गेल्या काही वर्षात शहरी भागातही या रानभाज्यांना महत्व प्राप्त होताना दिसते आहे. मे महिन्यात पडणाऱ्या अवकाळी पावसानंतर या रानभाज्या रानात बहरू लागतात. आदिवासी बांधव त्या निवडून बाजारात विक्रीसाठी आणतात. कोणत्या लागवड आणि मशागतीशिवाय या रानभाज्या वाढतात. त्यामुळे त्यांच्यात अनेक औषधी गुण असतात. जुनच्या पहिल्या आठवड्यापासून बदलापूर, अंबरनाथ आणि आसपासच्या भागात या रानभाज्यांची आवक वाढल्याचे दिसून आले आहे. बदलापूर आणि अंबरनाथ रेल्वे स्थानकाबाहेर आदिवासी महिला या रानभाज्या घेऊन बसलेल्या दिसतात. त्यासोबतच महत्वाचे चौक, बदलापुरच्या वेशीवर एरंजाड, सोनिवली, कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग, बदलापूर बारवीमार्गे मुरबाड रस्त्यावर आणि मुरबाडमध्येही या रानभाज्यांची विक्री करताना आदिवासी महिला दिसत आहेत. शेवळी, टाकळा, कुळू, कुड्याची फुले, चायवळ, तेलपट, मोहदुडी आणि लोतं या भाजा सध्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १० रूपये जुडीपासून ४० रूपयांपर्यंत या भाज्यांची विक्री केली जाते आहे. ग्राहकही या भाजांना पसंती देत आहेत.

**संवादामुळे नवग्राहक दूरच**

आदिवासी महिला रानभाज्या विक्री करताना त्याची पुरेशी माहिती देऊ शकत नसल्याने नवग्राहक या भाज्यांकडे वळताना दिसत नाही. या रानभाज्या विक्रीच्या पद्धती वेगळ्या आहेत. त्याची माहिती जुन्या पिढीकडे अधिक आहे. त्याचीही योग्य माहिती दिल्यास नवी पिढीही या भाज्यांकडे वळेल.

**जांभुळासाठीही ग्राहकांची गर्दी**

सध्या बदलापुरच्या जांभळानेही बाजारात गर्दी केली आहे. १६० ते २०० रूपये प्रति किलो दराने आदिवासी बांधव या जांभळांची विक्री करत आहेत. बदलापुरच्या जांभळांना भौगोलिक मानांकन नुकतेच प्राप्त झाले आहे. बारवी पर्यटनासाठी येणारे पर्यटक आवडीने या जांभळांना पसंती देत आहेत. सोबत करवंदांनाही पसंती मिळते आहे.

## हिंदुस्तान पेट्रोलियम

■ पद
१ मेकॅनिकल इंजिनिअर
२ इलेक्ट्रिकल इंजिनिअर
३ इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअर
४ सिव्हिल इंजिनिअर
५ केमिकल इंजिनिअर
६ सिनियर ऑफिसर (CGD)
७ सिनियर ऑफिसर (CGD) Projects
८ सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर (Non-Fuel Business)
९ सिनियर मॅनेजर (Non-Fuel Business)
१० मॅनेजर (Technical)
११ मॅनेजर (Sales-RD Product Commercialisation)
१२ डेप्युटी जनरल मॅनेजर (Catalyst Business Development)
१३ चार्टर्ड अकाउंटेंट (CA)
१४ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर
१५ IS ऑफिसर
१६ IS सिक्योरिटी ऑफिसर- Cyber Security Specialist
१७ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर
■ शैक्षणिक पात्रता: UR/OBC/EWS: ६०% गुण, SC/ST/PWD:५०% गुण
पद क्र.१: मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.२: इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग पदवी
पद क्र.४: सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.५: केमिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ०२/०५ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ११ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) इंजिनिअरिंग पदवी (Chemical/ Polymer /Plastics Engineering) (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.१२: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) १८ वर्षे अनुभव
पद क्र.१३: CA
पद क्र.१४: (i) M.Sc. (Chemistry (-nalytical/ Physical / Organic/Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१५: (i) B.Tech. (Computer Science/ IT Engineering) / MCA किंवा डाटा सायन्स पदव्युत्तर पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Computer Science/ Information Technology/ Electronics Communications Engineering/ Information Security)/ MCA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.१७: (i) M.Sc. (Chemistry-Analytical / Physical / Organic/ Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ते ५: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.६ ७: २८ वर्षांपर्यंत
पद क्र.८: २९/३२ वर्षांपर्यंत
पद क्र.९: ३८ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: ३४ वर्षांपर्यंत
पद क्र.११: ३६ वर्षांपर्यंत
पद क्र.१२: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.१३: २७ वर्षांपर्यंत
पद क्र.१४ १७: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.१५: २९ वर्षांपर्यंत
पद क्र.१६: ४५ वर्षांपर्यंत
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ Fee: General/OBC-NC/EWS: ११८०/- SC/ST/PWD: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ वेबसाईट: https://www.hindustanpetroleum.com/

# भारत-पाक सामन्याचे ऐतिहासिक स्टेडियम जमीनदोस्त

टी-२० वर्ल्ड कप सुरू असतानाच एक मोठी बातमी समोर आली आहे. ९ जून रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील ऐतिहासिक सामन्याचे साक्षीदार असणारे न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी स्टेडियम जमीनदोस्त केले जाणार आहे. या स्टेडियमवर एकूण ८ सामने खेळले गेले. १२ जून रोजी शेवटचा सामना झाला. ज्यामध्ये भारताने अमेरिकेचा पराभव केला. आता हे स्टेडियम १४ जूनला पाडण्यात येणार आहे. त्याची तयारी सुरू झाली आहे.

टी-२० विश्र्वचषक स्पर्धा वेस्ट इंडिज आणि अमेरिका यांनी संयुक्तपणे आयोजित केली आहे. जगभरात क्रिकेटचा प्रसार करण्याच्या उद्देशाने, आयसीसीने टी-२० विश्र्वचषक स्पर्धेचे सहयजमानपद अमेरिकेकडे सोपवले. याच्या माध्यमातून अमेरिकेत प्रथमच आयसीसीची सर्वात मोठी स्पर्धा खेळवली जात आहे. दरम्यान, न्यूयॉर्कमध्ये फक्त टी-२० विश्र्वचषक सामन्यांसाठी तात्पुरते स्टेडियम बांधण्यात आले होते. जे नासाऊ काउंटी स्टेडियम म्हणून ओळखले गेले.

या मैदानावर प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघांनी आठपैकी तीन सामने जिंकले, तर लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या संघांनी पाच सामने जिंकले. हे मैदान भारतासाठी लकी ठरले. या स्टेडियममध्ये भारतीय संघाने आपले सर्व गट सामने खेळले. या तीनही सामन्यात रोहित सेनेने विजय मिळवला. १२ जूनला टीम इंडियाने अमेरिकेचा ७ गडी राखून पराभव करत सुपर-८ मध्ये आपले स्थान पक्के केले. या सामन्यानंतर हे स्टेडियम पाडण्याचे काम सुरू झाले आहे.

एएनआय या वृत्तसंस्थेने त्यांच्या एक्स अकौंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यामध्ये घटनास्थळाजवळ एक बुलडोझर दिसत असल्याचे दिसून येत आहे. म्हणजेच टी-२० विश्र्वचषकासाठी बांधलेले हे स्टेडियम लवकरच पाडण्यात येणार आहे.

मैदान उभारण्यास २४८ कोटी रुपये खर्च अहवालानुसार, नासाऊ काउंटी स्टेडियम हे एक मॉड्यूलर स्टेडियम होते. जे तयार करण्यासाठी तब्बल २४८ कोटी रुपये खर्च करण्यात आले. स्टेडियच्या उभारणीसाठी १०६ दिवस लागले. त्याची सुरुवात सप्टेंबर २०२३ मध्ये झाली. स्टेडियमची एकूण आसन क्षमता ३४००० होती. आता हे स्टेडियम अवघ्या ६ आठवड्यांत पाडले जाणार आहे.




**स्टेडियममध्ये ड्रॉप इन पिचचा वापर**

नासाऊ क्रिकेट स्टेडियममध्ये ड्रॉप इन पिचचा वापर करण्यात आला. ही खेळपट्टी डलेडमधून मागवण्यात आली होती. या खेळपट्टीवरची सर्वाधिक धावसंख्या १३७ आहे. स्टेडियम पाडल्यानंतर येथील खेळपट्टीचे आयझेनहॉवर पार्कमध्ये जतन करण्यात येणार आहे. या खेळपट्टीचा स्थानिक क्रिकेट क्लबचे खेळाडू लाभ घेऊ शकणार आहेत.

**स्टेडियमच्या खेळपट्टीवरून वाद**

२०२४ च्या टी-२० विश्र्वचषकादरम्यान न्यूयॉर्कचे नासाऊ काउंटी स्टेडियम वादात सापडले. हे स्टेडियम १०६ दिवसांत तयार झाले. कदाचित त्यामुळेच खेळपट्टीवर असमान उसळी आणि गोलंदाजांना जास्त मदत मिळाली. खेळपट्टीचे स्वरूप पाहून सर्वांनाच आश्र्चर्य वाटले आणि आयसीसीनेही ते मान्य केले. या स्टेडियममध्ये झालेल्या सर्व सामन्यांचा रसिकांनी आनंद लुटला. लो स्कोअरींग सामन्यांमध्ये हाय व्होल्टेज ड्रामा दिसून आला. भारत-पाक सामनाही असाच झाला. टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना केवळ ११९ धावा केल्या, परंतु पाकिस्तानला या लक्ष्याचा पाठलाग करता आला नाही आणि सामना ६ धावांनी गमावला.



# रक्तातील लोह वाढवण्यासाठी 'बीट, अननस अन् लिंबाचा रस ठरेल का फायदेशीर?

सध्या सोशल मीडियावर तुम्हाला पडलेल्या तुमच्या प्रत्येक प्रश्नांचे उत्तर सापडते. परंतु, त्या उत्तराची किंवा उपायाची पडताळणी करणे हे अतिशय महत्त्वाचे असते. इन्स्टाग्राम या सोशल मीडियावर आहारतज्ज्ञ दिशा सेठीने शरीरातील लोह कमतरतेवर एक रामबाण उपाय सांगणारा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओच्या म्हणण्यानुसार बीट, अननस, लिंबाचा रस आणि आले यांना पाण्यात मिसळून पिण्याने निमिया कमी करण्यासाठी फायदा होऊ शकतो. मात्र, हे पेय खरंच फायदेशीर ठरू शकते का ते पाहा.

बीटामध्ये नवीन लाल रक्तपेशी तयार करण्यासाठी आणि निमियाशी लढण्यासाठी भरपूर प्रमाणात लोह असते असे म्हटले जाते, असे मुंबईतील परळ भागातील, ग्लेनिगल्स हॉस्पिटल्सच्या इंटर्नल मेडिसिन्स, वरिष्ठ सल्लागार, डॉक्टर मंजुषा अगरवाल यांनी म्हटले असल्याचे द इंडियन एक्स्प्रेसच्या एका लेखावरून समजते. तसेच, अननसामध्ये उच्च प्रमाणात असणाऱ्या क जीवनसत्वामुळे रक्तात लोह शोषून घेण्यासाठी फायदा होत असून, संपूर्ण रोगप्रतिकारकशक्ती सुधारण्यासाठी मदत होते, असेही म्हटले जाते. असंही पुढे डॉक्टर अगरवाल म्हणतात.

बीट, अननसाचा रस रक्तातील लोहासाठी फायदेशीर ठरू शकतो का?
या सर्व घटकांच्या एकत्रित रसामधून चांगल्या प्रमाणात डायटेरी लोह मिळते, खास करून बीटामधून. आणि हे लोह उत्तम प्रकारे शरीरात शोषून घेण्यासाठी अननस आणि लिंबाच्या रसातील उच्च क जीवनसत्त्वाचे प्रमाण मदत करते, असे बंगळुरूमधील क्छइठ लेआऊट, क्लाउडनाईन ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या मुख्य क्लिनिकल आहारतज्ज्ञ अभिलाषा व्ही यांनी सांगितले आहे. अननसातील ब्रोमेलेन आणि लिंबूमध्ये सायट्रिक ॲसिड पचनास मदत करतात, ज्यामुळे पोषक घटक उत्तमरीत्या शोषून घेतले जातात, असे त्या म्हणतात.

मात्र, बीट-अननस आणि लिंबाचा रस घेताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. हा रस काहींसाठी फायद्याचा ठरू शकतो, मात्र काहींवर त्याचा विशेष परिणाम दिसणार नाही, असे डॉक्टर अगरवाल म्हणतात.

या पेयामुळे तुम्हाला ऊर्जा मिळून तुमचा थकवा घालवण्यास मदत होऊ शकत असली तरीही शरीरातील लोहाची कमतरता दूर करण्यासाठी रामबाण उपाय म्हणू शकत नाही. सोशल मीडियावर दाखवल्या जाणाऱ्या गोष्टींचा लगेच प्रयोग करून पाहू नका. अशक्तपणा, चक्कर येणे किंवा डोके दुखणे, हृदयाचे ठोके वाढणे, अशक्त दिसणे, धाप लागणे आणि हात पाय थंड पडण्यासारख्या लोहाशी संबंधित लक्षणांबद्दल सावधगिरी बाळगा, असा सल्ला डॉक्टर अगरवाल यांनी दिला आहे.

डॉक्टर अगरवाल यांच्याशी सहमती दर्शवत, डॉक्टर अभिलाषा म्हणतात की, हे पेय जरी लोहाची पातळी वाढवण्यास मदत करू शकत असले, तरीही वैद्यकीय उपचार किंवा आरोग्यसेवा व्यावसायिकांनी सांगितलेल्या उपचारांमध्ये बदल करू नका. निमिया, अशक्तपणा, डोकेदुखी, रेस्टलेस लेग सिंड्रोम, गर्भधारणेच्या समस्या, हृदय आणि फुफ्फुसाच्या समस्या आणि थकवा यांसारख्या लोहसंबंधी आरोग्याच्या तक्रारी भविष्यात होऊ नये यासाठी वेळोवेळी लोहाची पातळी तपासत रहा.

जे डॉक्टर तुम्हाला आयर्न सप्लिमेंट्सबद्दल मार्गदर्शन करू शकतात अशांचा सल्ला घ्यावा आणि त्यांनी सांगितलेल्या डोसचे पालन करावे. पालेभाज्या, अंडी, भोपळ्याच्या बिया, बीन्स अशा लोहयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करा. त्याचबरोबर ब्रोकोली, लाल आणि हिरव्या सिमला मिरची, फ्लॉवर, टोमॅटो, स्ट्रॉबेरी, अननस आणि खरबूज यांसारखे क जीवनसत्त्व असणारे पदार्थ खावे, असे डॉक्टर अगरवाल म्हणत असल्याचे द इंडियन एक्स्प्रेसच्या एका लेखावरून समजते.

# शेतकरी बांधवांनो, बियाणे खरेदी करताना ही काळजी घ्या

ठाणे : ठाणे जिल्ह्यात खरीप हंगामास सुरूवात झालेली असून जिल्हयात खरीप हंगामाखाली ६०,००० हेक्टर एवढे क्षेत्र आहे, त्यापैकी भात पिकाखालील सरासरी क्षेत्र ५६,००० हेक्टर एवढे आहे. भात बियाण्यांची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यात पेरणीच्या कामास सुरूवात झाले असून शेतकऱ्यांनी भात बियाणे खरेदी करताना काळजी घ्यावी असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली खरीप हंगामाचे नियोजन पूर्ण झाले आहे. त्याप्रमाणे बियाणांच्या गुणवत्ता नियंत्रणाचे काम बियाणे कायदा १९६६, बियाणे नियम १९६८ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३ अन्वये करण्यात येत आहे अशी माहिती जिल्हा कृषि विकास अधिकारी रामेश्वर पाचे यांनी दिली.

### बियाणे खरेदी करताना ही काळजी घ्या

- गुणवता व दर्जाची हमी देणाऱ्या अधिकृत बियाणे विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदी करावे.
- बनावट अथवा भेसळयुक्त बियाण्यांची खरेदी टाळण्यासाठी अधिकृत बियाणे विक्रेत्यांकडून पावतीसह बियाणे खरेदी करावे. पावतीवर बियाणांचा संपूर्ण तपशील उदा. पिकाचे नाव, वाण, संपूर्ण लॉट नं., बियाणे उत्पादक कंपनीचे नाव, किंमत, खरेदीदाराचे नाव व पत्ता इत्यादी बाबींचा उल्लेख असणे आवश्यक आहे. तसेच रोख किंवा उधारीची पावती घ्यावी.
- खरेदी केलेल्या बियाणांचे वेष्टन, पिशवी, टॅग, खरेदीची पावती व थोडे बियाणे कापणी होईपर्यंत जपून ठेवावे.
- खरेदी केलेले बियाणे त्या हंगामासाठीच आहे याची खात्री करावी.
- भेसळीची शंका दूर करण्यासाठी बियाणांची पाकिटे, पिशव्या सिलबंद अथवा मोहरबंद असल्याची खात्री करावी.
- बियाणे उगवणीच्या खात्रीसाठी पाकिटावरची, लेबलवरील अंतिम मुदत पाहून बियाणे खरेदी करावे.

डोंबिवली एमआयडीसी

# धोकादायक कंपन्यांच्या स्थलांतराबाबत बैठक संपन्न

डोंबिवली : डोंबिवलीतील एमआयडीसी परिसरात गत महिन्यात रासायनिक कंपनीत झालेल्या स्फोटामुळे जिवीत व वित्तहानी व नजीकच्या कंपन्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याचे आपणां सर्वांना ज्ञात आहे. डोंबिवलीतील औद्योगिक क्षेत्रात झालेल्या स्फोटाची शासनाने त्वरीत दखल घेवून या संदर्भात प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अधिपत्त्याखाली दि. २७ मे २०२४ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक धोकादायक/अतिधोकादायक कंपन्यांचे स्थलांतराबाबत शासनाने, कृती आराखडा तयार करण्यासाठी कृती आराखडा समिती दि. २८ मे २०२४ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करुन समितीमध्ये शासनाकडील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, डोंबिवलीतील औद्योगिक परिसरातील कंपन्यांचे सर्व्हेक्षण सुरु असुन शासनाने दिलेल्या पश्र्नावलीनुसार माहिती एकत्र करण्यात येत असून, सदरहू माहितीचे अनुषंगाने शासनाकडून आदेश प्राप्त होताच त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शासन स्तरावर उपरोक्त उपाययोजना सुरु असतानाच, आज सकाळी पुन्हा डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील मालदे या कंपनीस शॉर्टसर्किटमुळे आग लागली व ती आग शेजारी असलेल्या इंडो अमेन या कंपनीत पसरली असून या आगीमुळे कोणीही व्यक्ती जखमी अथवा जिवीत हानी झाली नाही. आगीचे वृत्ताची माहिती कळताच, महापालिका व एम.आय.डी.सी. प्राधिकरणाने आगीवर नियंत्रणासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करुन आग विझवण्यात यश मिळाले आहे.

डोंबिवली औद्यागिक परिसरातील घटनास्थळा जवळच्या ज्या नागरीकांना श्वसनाचा त्रास असल्याच्या प्राथमिक तक्रारी प्राप्त होताच, अशा नागरीकांना आग आटोक्यात येईपर्यत सुरक्षित स्थळी स्थलांतरीत होणेबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या.

## १ कोटीची फसवणूक

डोंबिवली : डोंबिवलीतील वीर मारूती डेव्हलर्पसचे चार विकासक आणि भागीदार यांनी ठाणे, पालघर जिल्ह्याच्या विविध भागातील १४ घर खरेदीदारांची गेल्या दहा वर्षात एक कोटी चार लाख ५३ हजार ९२८ रूपयांची फसवणूक केली आहे. दहा वर्ष झाले तरी विकासक आपणास घराचा ताबा देत नाही म्हणून १४ घर खरेदीदारांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे विष्णुनगर पोलिसांनी विकासकांविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

वीर मारूती डेव्हलर्पसचे भागीदार कुंदन एकनाथ म्हात्रे (५०), कुणाल भास्कर म्हात्रे, किशोर यशवंत घैसास, वसंत पि. पटेल आणि माजी नगरसेविका अर्चना कुंदन म्हात्रे यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

# प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या बसगाड्या परत घ्या

**६१ बस मालक आक्रमक | अशोक लेलँड च्या कार्यालयात चालक, मालकांचा ठिय्या**

**ठाणे : मोठ्या प्रमाणात प्रवाशी वाहतूक करणाऱ्या अशोक लेलँडच्या बसगाड्या धोकादायक असून या गाड्या अचानक बंद पडत आहेत. शिवाय, भरधाव वेगात असताना अनेक भाग नादुरूस्त होत आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून याबाबत करूनही संबधीतांकडून कार्यवाही केली जात नसल्याने मुंबई बस मालक संघटनेने आज कंपनीच्या माजिवडा येथील कार्यालयावर धडक दिली. वारंवार नादुरूस्त होणाऱ्या सुमारे ६१ नवीन बस गाड्या कंपनीने पुन्हा ताब्यात घ्याव्या अशी मागणी यावेळी करण्यात आली.**



बस चालत असताना फ्रंट व्हील हब क्रॅक होणे, व्हील डिस्क तुटणे, क्लच / प्रेशर प्लेट / रिलीझ बेरिंग, क्लच सिलेंडर / डिझेल पाईप तुटणे, सायलेन्सर पाईप फुटणे, पुरवठा करणे करणारे पाईप फुटणे, गियर बॉक्स - ब्रेक लायनर समस्या अशा अनेक अडचणी नव्या कोऱ्या बसगाड्यांमध्ये आहेत. अशोक लेलँडने विकलेल्या बस या सदोष असल्याने प्रवाशी आणि वाहन चालक, सहाय्यक यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या बसगाड्या बिघाड होऊन बंद पडत आहेत. या बसगाड्यांमधील अनेक भाग अचानक नादुरुस्त होत असल्याने बसला अपघात होण्याची शक्यता बळावली आहे. खासगी वाहतूक करणाऱ्या या बस गाड्यांमध्ये प्रवास करणाऱ्यामध्ये लहान मुले, लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असतो. मात्र, अचानक गाड्या बंद पडत असल्याने प्रवाशांना रस्त्यावर तासनतास अडकून पडावे लागत आहे. वारंवार बिघाडामुळे बस मालकांचेही आर्थिक नुकसान होत आहे. शिवाय, प्रवाशांकडून चालकांना घडत आहेत. याबाबत अनेकवेळा बस मालकांनी संबंधितांना कळवूनदेखील कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही. अशोक लेलँड ही कंपनी मोठ्या अपघाताची वाट पहात आहे का, असा सवाल करीत मुंबई बस मालक संघटनेने माजिवडा येथे हे आंदोलन केले.




यावेळी, धावत्या बसमधील हब तुटल्यामुळे बसचे होणारे नुकसान कोण सहन करणार? व्यवसायातील तोटा कोण सहन करणार? प्रवासादरम्यान आणि भविष्यातील प्रवासात वाहन निकामी झाल्यास प्रवाशांना परतावा, कर, विमा, बँक दायित्व, ब्रेकडाउनमुळे भविष्यातील बुकिंगवर परिणाम यावर उपाययोजना कोण करणार? ब्रेकडाऊन दरम्यान पोलिस आणि टोइंग चार्जेसचे नुकसान कोण करणार? वॉरंटीमध्ये ब्रेकडाउन दरम्यान आम्ही किमीचा विचार करणार आहोत का? कर्मचाऱ्यांचे पगार आणि त्यांच्या निवासाचा खर्च कोण करणार?प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण होण्यास कोण जबाबदार आहे? असे प्रश्न मुंबई बस मालक संघटनेने उपस्थित केले असून या ६१ नवीन बस गाड्या कंपनीने पुन्हा ताब्यात घ्याव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## एपीएमसीत कारवाई १३ लाखांचा अंमली पदार्थ जप्त

नवी मुंबई: नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने एपीएमसी मध्ये कारवाई करीत अंमली पदार्थ विक्री साठी आणलेल्या तीन जणांना अटक केली आहे. त्यांच्या कडून १३१. ५० ग्रॅम वजनाचा एम डी अंमली पदार्थ आढळून आलेला जप्त करण्यात आला आहे. त्याचे बाजार मूल्य १३ लाख १५ हजार असून त्यांनी एम डी कुठून आणले याचा तपास सुरु आहे.

जितेंद्र गुप्ता आणि भूपेंद्र हिरांचंद खंडेलवाल असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. जितेंद्र हा भंगार विक्रेता असून भूपेंद्र हा मालमत्ता दलाली करतो. दोघांनीही कमी वेळात अधिक पैसे मिळवण्याच्या उद्देशाने अंमली पदार्थ वितरण सुरु केले होते. हे दोन्ही आरोपी एम डी अर्थात मेफेड्रोन विकण्यास एपीईएमसी परिसरात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीरज चौधरी यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर कोपरी सिग्नल नजीक नाईन स्टोन हॉटेल परिसरात सापळा लावण्यात आला. दोन तासांच्या प्रतीक्षेनंतर दुपारी दोनच्या सुमारास दोन्ही संशयित आरोपी दिसताच त्यांना पकडण्यात आले. त्यांची अंगझडती घेतली असता जितेंद्र याच्या कडे ७लाख १५ हजार रुपयांचे ७१ ग्रॅम तर भूपेंद्र यांच्या कडे ६ लाख रुपयांची ६० ग्रॅम एम डी आढळून आले. या दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीरज चौधरी आणि अजय शिंदे यांच्या मार्गदर्शखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ, पोलीस उपनिरीक्षक कुलदीप मोरे निलेशकुमार महाडिक आणि रणजित जाधव सह पथकाने केली आहे.

# टोमॅटोच्या दरात वाढ; किरकोळीत प्रतिकिलो ८0रुपयांवर

नवी मुंबई: गेल्या चार ते पाच महिन्यापासून स्थिर असलेले टोमॅटोच्या दराने उसळी घेण्यास सुरुवात केली आहे. किरकोळ आणि घाऊक बाजारात टोमॅटोचे दर वधारले आहेत. परराज्यातून आणि महाराष्टातुन होणारी टोमॅटोची आवक कमी झाल्याने टोमॅटोचे भाव वाढले असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले आहे. बाजारात बुधवारी ४८ गाडी आवक झाली असून घाऊक मध्ये ८ रुपयांनी तर किरकोळ बाजारात दुपट्टीने वाढ झाली आहे. घाऊक मध्ये आधी २०-२४रुपयांनी उपलब्ध असलेले टोमॅटो आता २८-३२ रुपयांवर पोचले आहेत.

वाशीतील एपीएमसी बाजारात टोमॅटो कमी प्रमाणात दाखल होत आहे. परिणामी आवक कमी आणि मागणी जास्त यामुळे दरवाढ झालेली आहे. मागील आठवड्यात २ हजार क्किंटलहुन अधिक टोमॅटो दाखल होत होते ते आता १हजार ८००क्विंटल दाखल होत आहेत. पावसामुळे उत्पादन खराब होत तसेच शेतातून उत्पादन घेण्यास अडचणी येत आहेत, त्यामुळे बाजारात आवक कमी झाली आहे. महाराष्ट्रतुन सातारा,सांगली आणि संगमनेर तर बंगळूर मधून टोमॅटो दाखल होतात. मागील वर्षी जुलै मध्ये टोमॅटोच्या दराने उच्चांक गाठला होता. किरकोळ बाजारात १५० ते १८० रुपयांवर तर घाऊक बाजारात १०० ते ११० रुपयांपर्यंत पोहोचले होते. मात्र ऑगस्टनंतर टोमॅटोचे दर उतरले होते ते आतापर्यंत टोमॅटोचे दर आवाक्यात होते. मात्र आता पुन्हा टोमॅटोच्या दाराने उसळी घेतली असून घाऊक बाजारात प्रतिकिलो २८ ते ३२रुपये तर किरकोळ बाजारात ८० रुपयांनी विक्री होत आहे.



# पालिकेची दोन कनिष्ठ महाविद्यालये कागदावरच

नवी मुंबई: राज्य शासनाने नवी मुंबई महापालिकेच्या मागणीनुसार दोन शाळांमध्ये कनिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यासाठी नऊ महिन्यांपूर्वी म्हणजे सप्टेंबर २०२३ मध्ये परवानगी दिली असताना शहरात पालिकेची महाविद्यालये स्थापनेची प्रक्रिया कागदावरच राहिली आहेत.दहावीच्या निकालानंतर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची मुदतही संपत आली, परंतु नवी मुंबई महापालिकेची कुकशेत व कातकरी पाडा येथील कनिष्ठ महाविद्यालये कागदावरच राहिलेली आहेत. त्यामुळे याबाबत महापालिका शिक्षण अधिकाऱ्यांविरोधात प्रचंड रोष निर्माण झाला आहे.

नवी मुंबई महापालिकेत सराठी, हिंदी, उर्दू माध्यमासह राज्यातील सीबीएसई शाळा सुरू करणारी पहिली महापालिका असा टेंभा मिरवला जात असताना दुसरीकडे शासनाने ९ महिन्यांपूर्वी पालिकेला महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी दिली असूनही यंदाच्या शैक्षणिक वर्षात ही महाविद्यालये कागदावरच राहणार आहेत.नवी मुंबई महापालिकेत प्राथमिक व माध्यमिक विद्यालयांबरोबरच उच्च माध्यमिक महाविद्यालये सुरु करण्याची मागणी पालिकेच्यावतीने राज्य शासनाकडे करण्यात आली होती.

पावसाच्या पाण्याच्या साठवणीसाठी प्रकल्प

# २.२ लाख घन मीटरपेक्षा जास्त पावसाच्या पाण्याचा होणार पुनर्भरणा

पनवेल : टाटा स्टीलने जागतिक पर्यावरण दिनी रायगड जिल्ह्यातील खोपोलीमध्ये पावसाच्या पाण्याच्या साठवणीच्या नवीन प्रकल्पाचा शुभारंभ केला आणि प्रकल्पाच्या ठिकाणी १५०० पेक्षा जास्त झाडे लावून सस्टेनेबिलिटी महिन्याची सुरुवात साजरी केली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ रायगडचे क्षेत्रीय अधिकारी जयंत हजारे आणि क्षेत्र अधिकारी मीना पवार, खोपोली व होसूरचे कार्यकारी प्लान्ट प्रमुख कपिल मोदी आणि सावरोली गावाचे सरपंच संतोष गणेश बैलमारे हे यावेळी उपस्थित होते.



पावसाच्या पाण्याची साठवण करणाऱ्या या नवीन प्रकल्पामुळे प्लान्टची ताज्या पाण्याची आवश्यकता ५० हजार घन मीटरने कमी होईल. या प्रकल्पामध्ये ९ पुनर्भरण खड्ड्यांद्वारे २.२ लाख घन मीटरपेक्षा जास्त पावसाच्या पाण्याचा जलचरामध्ये पुनर्भरणा केला जाण्याची अपेक्षा आहे.सह्याद्री पर्वतरांगांच्या पायथ्याशी वसलेले खोपोली हे रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील एक औद्योगिक शहर आहे. इथे दरवर्षी १८५०-३९१४ मिलीमीटर पाऊस होतो, त्यामुळे महाराष्ट्रातील सुपीक पाणलोट क्षेत्रांमध्ये खोपोलीचा समावेश होतो. टाटा स्टीलमध्ये जून हा सस्टेनेबिलिटी महिना म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने अनेक वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असून, यामध्ये कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धा, जागरूकता सत्रे, वृक्षारोपण मोहीम इत्यादींचा समावेश असणार आहे.

## बस फेऱ्या वाढवा

पनवेल : करंजाडे वसाहतीमध्ये घर घेतलेल्या नागरीकांमध्ये त्यांची फसवणूक झाल्याची भावना निर्माण होत आहे. सिडको महामंडळाने येथे खासगी विकासकांना इमारती बांधून रहिवाशांना राहण्यासाठी भोगवटा प्रमाणपत्र दिले मात्र पाणी, वाहतूकीसाठी बस अशा सोयीसुविधा अद्याप या परिसरात पुरेशा न सुरू झाल्याने नागरिक वैतागले आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रम सेवेची ७६ क्रमांकाची बससेवा पनवेल रेल्वेस्थानक ते करंजाडे या मार्गिकेवर धावते. मात्र या बसच्या फेऱ्या कमी असल्याने प्रवाशांची रात्रीच्यावेळी प्रचंड गर्दी पनवेल रेल्वेस्थानकाबाहेर दिसते. बसच्या अपुऱ्या सोय सोबत तीन आसनी रिक्षांची संख्या कमी असल्याने प्रवाशांना ताटकळत रात्रीच्यावेळी बसची प्रतिक्षा करावी लागते. यामध्ये कामावरुन घरी परतणाऱ्या महिलांचे प्रमाण मोठे आहे.

# जल जीवन मिशन कामांना गती मिळावी अन्यथा कारवाई करण्यात येईल : छायादेवी शिसोदे

**पुढील दोन महिन्यांत जल जीवन मिशनचे काम पुर्ण करण्याचे आदेश**



ठाणे : जल जीवन मिशन अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील प्रगतीपथावर असलेल्या कामांची प्रभावी अंमलबजावणी होऊन कामे जलद गतीने पुर्ण होण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांच्या अध्यक्षते खाली आज आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जल जीवन मिशन अंतर्गत एकुण ७२० कामे मंजुर असुन त्यापैकी १२८ योजनांची कामे पुर्ण झालेली आहेत. ५९२ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावर असलेल्या योजनांचा तपशिलवार आढावा घेण्यात आला.

जल जीवन मिशनच्या संबंधित ठेकेदारांना योजनांच्या कामांची गती तात्काळ वाढवुन कामे पुढील दोन महिन्यात पुर्ण करण्याचे आदेश यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले. तसेच या बैठकीत ठेकेदारांना प्रत्यक्ष काम करत असताना उद्भवणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. या अडचणींवर योग्य मार्गदर्शन करण्यात आले असून ही कामे विहीत मुदतीत पुर्ण न झाल्यास संबंधित ठेकेदारांवर कार्यवाही करण्यात येईल असे आढावा बैठकीत सांगितले गेले.

या बैठकीस कार्यकारी अभियंता प्रदीप कुलकर्णी, उपकार्यकारी अभियंता चेतना पाटील, उपअभियंता शहापुर विकास जाधव, उपअभियंता भिवंडी प्रकाश सासे, उपअभियंता मुरबाड जगदीश बनकारी, उपअभियंता कल्याण आशिष कटरे, उपअभियंता अंबरनाथ अमित शिंदे, अभियंता ठाणे केतन चौधरी, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार एन.जे.एस. व नाबार्ड अंभियंता तसेच ठेकेदार उपस्थित होत.

योग्य गुणवत्ता व दर्जा राखुन कामे करावीत याबाबत संबंधित ठेकेदार यांनी खबरदारी घ्यावी तसेच या कामांचे सनियंत्रण व मार्गदर्शन करणेकरीता राज्य स्तरावरून नेमण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे अभियंता यांनी जल जीवन मिशनच्या नियमाचे काटेकोरपणे पालन करुन संबंधित ठेकेदार यांच्या मार्फत कामे करून घ्यावीत अशा सुचना देखील देण्यात आल्या आहेत.

पाणी पुरवठा उपविभागातील अभियंता यांनी या कामांबाबत खबरदारी बाळगुन ठेकेदार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्यावर योग्य नियंत्रण ठेऊन कामे करावीत त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गाव/पाड्यांतील ग्रामस्थांना पाण्याची कायम स्वरुपी व्यवस्था होणार असुन पाणी टंचाईवर मात करणे शक्य होणार आहे.

# जागतिक रक्तदान दिनानिमित्त वाशी सार्वजनिक रूग्णालयात विविध उपक्रमांचे आयोजन

नवी मुंबई : मुलभूत रक्तगट प्रणालीचे संशोधक आणि त्यांचे वर्गीकरण करणारे नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ डॉ. कार्ल लँडस्टेनर यांचा १४ जून हा जन्मदिवस जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सर्व स्वैच्छिक रक्तदात्यांचा आणि रक्तदान शिबिराच्या आयोजकांचा त्यांच्या सक्रिय सहभागासाठी सन्मान केला जातो. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून रक्तदानाव्दारे त्यांनी योगदान दिल्याने इतरांनाही रक्तदानासाठी प्रोत्साहन मिळते.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनेही दरवर्षी जागतिक रक्तदान दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षीही महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी येथील सार्वजनिक रूग्णालयात वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

७० ते ७५ थॅलेसेमिया मुले इतर सर्व विभागांव्यतिरिक्त वाशी रूग्णालयातील रक्तपेढीतून नियमितपणे रक्तसंक्रमणचा लाभ घेत आहेत. 'रक्तदानाची २० वर्षे साजरी केली : धन्यवाद रक्तदात्यांनो' असे यावर्षीचे रक्तदान दिनाचे घोषवाक्य असून त्यादृष्टीने रक्तदात्यांचे आभार व्यक्त करीत नमुंमपा आरोग्य विभागाच्या वतीने वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या नियंत्रणाखाली वाशी सार्वजनिक रूग्णालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. यामध्ये, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, पथनाट्य असे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. त्याचप्रमाणे रक्तदानाविषयी जनजागृती करण्यात येणार असून महानगरपालिकेच्या रक्तपेढीमध्ये जास्तीत जास्त रक्त जमा करण्याकडे लक्ष दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, रक्तदानाला पाठिंबा देण्यासाठी जागतिक रक्तदान दिनानिमित्त रक्तदान करण्याची प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे.

रक्तदान हे रूग्णांच्या जीवरक्षणाचा सर्वोत्तम मार्ग असून लोकांना याचे महत्व पटवून देणे व त्यांना रक्तदान चळवळीत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून संपूर्ण जगभरात रक्तदान दिन साजरा करण्यात येतो. नवी मुंबई महानगरपालिकेनेही रक्तदान दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले असून याविषयीच्या अधिक माहितीसाठी २७८८८७५० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

अनूसूचित व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी

# परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

नवी मुंबई : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत प्रती वर्षी अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील (७५ विद्यार्थ्यांना (मुले-मुली) परदेशांमध्ये अध्ययन करण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी परदेश शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी दि.१२ जुलै २०२४ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन वंदना कोचुरे प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण मुंबई विभाग यांनी केले आहे. सामाजिक न्याय विभागाची परदेशी शिष्यवृत्ती योजना अत्यंत महत्वाची योजना आहे. अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशात पदव्युत्तर पदवी आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पी.एच.डी.) विशेष अध्ययन करण्यासाठी आर्थिक मदत देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेंतर्गत राज्यातील अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पदव्युत्तर पदवी आणि पी.एच.डी.साठी अद्ययावत परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. या योजनेसाठी विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्यतील असावा व त्यांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा जास्त नसावे इत्यादी या योजनेच्या अटी आहेत. विद्यार्थ्यांनी अर्जाचा नमुना व अधिक सविस्तर माहितीसाठी www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरील 'ताज्या घडमोडी' या लिंकवरुन डाऊनलोड करुन घ्यावी व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३0 टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१